# जिल्हा परिषद अमरावती

## कार्यवृत्त

**दिनांक २८ जुलै २०१६** रोजी सिंचन विभागातंर्गत सुरु असलेल्या कामांचा आढावा विभागातील शाखा अभियंता आणि संबंधित उप अभियंता यांचेकडून घेण्यात आला. सभेस प्र.उप कार्यकारी अभियंता श्री. वर्मा, श्री. प्रदीप ढेरे, उप का.अ. अमरावती, श्री. शिरीष तट्टे, उप अभियंता चिखलदरा, श्री. ईश्वरकर, प्र.उप का.अ. धारणी आणि अंजनगांव , श्री. एस.के. कुलकर्णी उप का.अ. अचलपूर, श्री. सुरडकर, प्र. उप का.अ. वरुड श्री. अरविंद डाखोरे उप का.अ. तीवसा तसेच मुख्यालयीन अभियंता श्री. लोखडे, श्री. मोवाळे तसेच लिविदा लिपीक श्री. राहूल खेडकर हे उपस्थित होते. सभेत खालील प्रमाणे सूचना देवून त्यावर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आलेत.

**मुद्दा क्रमांक : १ - जलयुक्त शिवार योजना**

**सन २०१५-१६**

सदर अभियानातंर्गत सन २०१५-१६ मध्ये मंजुर असलेल्या १४३ कामांचा तालुका निहाय आढावा संबंधित उप अभियंता यांचेकडून घेण्यात आला. कामाची सद्यस्थितीपुढील प्रमाणे आहे -

| तालुका | प्र.मा. प्राप्त कामे | ता.मा. प्राप्त कामे | NIT प्राप्त निविदा प्रसिध्दीसाठी | W/o देवून प्रत्यक्ष कामे सुरु/प्रगतीत | तालुका | प्र.मा. प्राप्त कामे | ता.मा. प्राप्त कामे | NIT प्राप्त निविदा प्रसिध्दीसाठी | W/o देवून प्रत्यक्ष कामे सुरु/प्रगतीत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| धारणी | ०८ | ०८ | ०२ | ०६ CAFO | वरुड | ४० | ४० | ०६ | ३४ |
| मोर्शी | १३ | १३ | ०६ +१=७ | ०६ | अम. | ०३ | ०३ | ०२ | (१ रद्द-पोहरा) |
| भातकुली | ०६ | ०६ | ०१ | ०५ | चा.रे. | ०२ | ०२ | ० | ०२ |
| धा.रे. | ०१ | ०१ | ०१ | ० | तीवसा | ०५ | ०५ | ०१ (०३ स्वि.) | ०१ पूर्ण |
| चा.बा. | ०६ | ०६ | ०२(०४ स्वि.) | ० | अचलपूर | ०४ | ०४ | ०४ | ० |
| चिखलदरा | २३ | २३ | ११ (१२ स्वि.) | ० | अंजनगांव | १५ | १५ | ०३ (०३ स्वि.) | ०९ |
| दर्यापूर | १७ | १७ | ० | १५ | | | | | |

**सन २०१६-१७** मध्ये मंजुर असलेल्या १०५ कामांचा तालुका निहाय कामाची सद्यस्थितीपुढील प्रमाणे आहे -

| तालुका | प्र.मा. प्राप्त कामे | ता.मा. प्राप्त कामे | NIT प्राप्त निविदा प्रसिध्दीसाठी | W/o देवून प्रत्यक्ष कामे सुरु/प्रगतीत | तालुका | प्र.मा. प्राप्त कामे | ता.मा. प्राप्त कामे | NIT प्राप्त निविदा प्रसिध्दीसाठी | W/o देवून प्रत्यक्ष कामे सुरु/प्रगतीत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| धारणी | ०३ | ०३ | ०३(नि.स्वि.) | | वरुड | ५३ | ५३ | ०१ | ५२ |
| मोर्शी | २० | २० | ० | १९ | अम. | ०६ | ०६ | ०५ | (०१ below |
| भातकुली | ०५ | ०५ | ०५(नि.स्वि.) | for S.D | चा.रे. | ०३ | ०३ | ०३(नि.स्वि.) | ० |
| धा.रे. | | | | | तीवसा | ०१ | ०१ | ०१ | ० |
| चा.बा. | ०९ | ०९ | ०२(NIT) ०६ नि.का. | ० | अंजनगांव | ०५ | ०५ | ०२(NIT) ०३ नि.स्विका. | |

चिखलदरा तालुक्याती मंजुर १६ कामांचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून तांत्रिक मान्यतेकरिता विभागास सादर करण्यात आले असल्याचे संबंधित उप अभियंता श्री. ईश्वरकर यांनी सांगितले. सदर अंदाजपत्रकाबाबत विभागातील शाखा अभियंता तसेच उप कार्यकारी अभियंता यांचेकडून माहिती घेतली असता सदर अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार आता कार्यकारी अभियंता नसल्याचे सागण्यात आले. याबाबत विभागाकडून अधीक्षक अभियंता यांना सुध्दा शासन निर्णय व परिपत्रकाचा आधार घेवून तांत्रिक मान्यता कार्यकारी अभियंता जलसंधारण विभाग, अमरावती यांना असल्याचे लेखी पत्राव्दारे कळविले आहे. त्याच बरोबर सदरचा विषय अधीक्षक अभियंता यांना सुध्दा अवगत करण्यात आला असल्याचे उप कार्यकारी अभियंता श्री. वर्मा यांनी सांगितले. जिल्हा परिषद विभागात जवळपास असे अंदाजे ५० अंदाजपत्रके तांत्रिक मान्यतेअभावी प्रलंबित असल्याचे निदर्शनास येत आहे. याबाबत या विषयाशी संबंधित सर्व शासन निर्णय /परिपत्रके उपलब्ध करुन शासनास मार्गदर्शन घेता येईल असे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सांगितले. सदर विषयाची संपूर्ण टिपण्णी तयार करुन मा. मु.का.अ. यांचे स्वाक्षरीने शासनास मार्गदर्शन मागविण्यासाठी नस्ती तयार करावी.

**मुद्या क्रमांक २ - जिल्हा नियोजन समिती कडून प्राप्त निधी व आढावा**

मा. जिल्हाधिकारी यांचेकडून स्पील कामांना साठी रु ८४ लख निधी प्राप्त झालेला आहे. सदर निधीचे तातडीने सदर कामांवर वितरण करण्यात यावे. तसेच कोल्हापुरी बंधारे दुरुस्ती व इतर कामांना मंजुर आराखडाप्रमाणे काही निधी प्राप्त झालेला आहे. सदर कामांचे नियोजन/निवड शासनाच्या मार्गदर्शक सूचना व नियोजन विभागाच्या शासन निर्णयानुसार तयार करुन प्रस्ताव सक्षम प्राधीकरणाकडे मंजुरीस्तव सादर करावेत.सदरचे कामे तातडीने करण्यासाठी मंजुरी/निविदा प्रक्रिया व तद्अनुषंगिक कामे त्वरीत करण्यात यावी.

सभेस व्ही.आय.डी.पी. महात्मा फुले जलभूमी संधारण अभियान इ. कामांचा आढावा घेण्यात आला. कामांची स्थिती निश्चित व्हावी याकरिता सभेत माहिती सादर करण्यासाठी विशिष्ट प्रपत्र तयार करुन विभाग, उप अभियंता व निविदा यांना देण्यात आलेत. जलयुक्त शिवार तसेच इतर योजनांची माहिती सदर प्रपत्रांमध्ये तयार करुन दिनांक २९ जुलै २०१६ रोजी सांयकाळ पर्यत सादर करण्याच्या सूचना सर्व उपस्थितांना देण्यात आल्यात.

**(संजय इंगळे)**
**अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अमरावती**

जा.क्र : जिप/अतिमुकाअ/स्विस/११ /१६
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय
दिनांक : २९ जुलै २०१६

प्रति,
कार्यकारी अभियंता,
लघुसिंचन, जिल्हा परिषद अमरावती.

**प्रतिलिपी सविनय सादर - मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती.**